# राशिभविष्य - मे, २०१३.

**दादा दामले** (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ-शनि-हर्षल हे महत्त्वाचे ग्रह प्रतिकुल असणार असून गुरु-शुक्र व काही प्रमाणात बुध पूर्णपणे अनुकुल असणार आहेत. त्यामुळे या प्रतिकुल काळात मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अतिशय हट्टी, हेकट, मानापमान फ़ार असणारा आणि अतिशय संतापी असा झाला असण्याची शक्यता आहे. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल व त्याचा सर्व प्रकारच्या आरोग्यावर दुष्परिणाम होईल. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर अत्यंत सहनशील बनून मन व बुद्धी सतत शांत राखली पाहिजे. हट्टी स्वभावामुळे अकारण श्रम व दगदग करून स्वतःचा जीव थकवू नका. आप्तेष्टांशी भांडणे टाळा. आर्थिक फ़सवणूक होणार नाही याची काळजी घ्या. वाढता खर्च भागविण्यासाठी निरर्थक धडपड करू नका. सहनशीलतेने व शांत मनाने विपरीत काळ व्यतीत करा, तरच अनारोग्य होणार नाही. नपेक्षा उष्णताविकार बळावतील. पण गुरु ग्रहामुळे व शुक्राच्या अनुकुलतेने कुटुंबात मनोनुकुल घटना घडतील, अर्थलाभ होईल व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. शनि ग्रहामुळे जीवनसाथीच्या अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागण्याची शक्यता दिसते. तसेच कुसंगतीमुळे नुकसान होणे संभवते. जपा. राहूमुळे नको ते विचार मनात येतील. शासकीय नोकरदार मंडळीना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा सर्व काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यातही महिन्याचा पूर्वार्ध अधिक मनस्तापदायक असणे संभवते. महिन्याच्या संपूर्ण काळात रवि-मंगळ-बुध हे तीन ग्रह प्रतिकुल होणार असल्यामुळे असह्य मनस्ताप, शरीरपीडा, गैरसमजुती, नियोजित कार्यात अडथळे येणे, फ़सवणूक होणे, आर्थिक नुकसान होणे, वाढत्या खर्चाची चिंता निर्माण होणे अशापैकी घटना घडून गलितगात्र थकवा जाणवेल व गहरे नैराश्य येईल त्यात स्वतःचे अनारोग्य, लहरी स्वभाव व आप्तेष्ट भांडणे यांची भर पडून जीवन असह्य होईल. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत मन व बुद्धी शांत ठेवून आणि हट्टी स्वभावावर नियंत्रण ठेवून आचरण केलेत तर गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद व सुखसमाधान चाखू शकाल. हृदयविकार, रक्तदाब असे आजार असणारांनी तर अधिकच जपले पाहिजे. शारीरिक उष्णता भडकून या राशीच्या काही मंडळीना उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. काही मंडळीना नित्रविकार सतावतील. जपा. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने अनारोग्य हद्दीबाहेर जाणार नाही. तसेच चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना, साहित्यिकांना, कोळसा, लोखंड व्यापार असणारांना, मानसिक रोगतज्न्याना, द्रव पदार्थाचा व्यापार करत असणारांना काळ अनुकुल. प्रगतिकारक वा लाभदायक होईल. मात्र २२, २३ व २४ मे या तीन दिवशी मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते मित्रांशी भांडणे होतील. जपा. शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व मन व बुद्धीवरील ताण हलका होईल. गुरु-शुक्र-हर्षल लाभयोगामुळे अनपेक्षित अर्थलाभ

होणेही शक्य आहे. तसेच या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मीयांशी व्यापार, व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे अर्थलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा केवळ पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होणार आहे. म्हणून या राशीच्या मंडळीनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. अध्यात्मात रस असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ आध्यात्मिक प्रगतीसाठी अनुकुल होईल. शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याच्या पूर्वार्धात विविध प्रकारचे लाभ होतील. बढती, पगारवाढ, काहीना मानाचे स्थान तर काहीना उच्च पद मिळण्याची शक्यता दिसते. स्वतंत्र व्यापार, व्यवसाय असणारांना महिन्याचा पूर्वार्धच प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. काही मंडळीना महिन्याच्या पूर्वार्धातच मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांनाही काल लाभदायक होईल. मित्रांशी वितुष्ट येऊ देऊ नका. सामान्य नोकररदार मंडळीना मात्र अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी कठोर कष्ट-परिश्रम करावे लागतीलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात मात्र या राशीच्या सर्वांनाच प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. काही जुनी मनस्ताप देणारी प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन असह्य मनस्ताप देतील. जपा. सतत मनाविरुद्ध घटना घडतील. मानहानी होणेही संभवते. जपा. वाढत्या खर्चाची चिंता कराल. त्यामुळे काही मंडळीना गहरे नैराश्य येणे शक्य आहे. आर्थिक व्यवहार जपून व सावधानतेनेच करा. अध्यात्म, सामाजिक कार्य यांची आवड असणारांना काळ प्रगतिकारक व मन:शांती देणारा ठरू शकेल. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील. काहींना जवळच्या किंवा दूरच्या किंवा परदेश प्रवासाचे योग संभवतात. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या शनि-राहूमुळे या राशीच्या मंडळीना अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये व तब्येतीची विशेष काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर दररोज नियमाने " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे वाचन करावे.

**(४) कर्क -** य़ा राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याच्या काळ अतिशय अनुकुल आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींच्या इच्छाआकांक्षा पूर्ण होण्याची शक्यता आहे. तसेच हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. त्यामुळे विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. मोठ्या लोकांच्या ओळखी होतील. महिन्याच्या उत्तरार्धात विविध प्रकारचे लाभ होतील. काहीजणांना बढती, काहींना पगारवाढ, असे काही प्राप्त होणे संभवते. पण खाजगी नोकरदार मंडळीना मात्र कामाचा ताण सहन करावा लागेल. सहकारी मंडळींशी भांडणे होण्याची शक्यता आहे. कष्ट-परिश्रमानेच अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात मात्र अडचणी, खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. पण जन्मकुंडलीत योग असतील तर महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काही मंडळीना मौल्यवान गोष्टींचा लाभ होण्याची शक्यता आहे. तसेच मित्रांशी भांडणे होणेही संभवते. अशा परिस्थितीत या राशीच्या लाभस्थानातील गुरु-शुक्र या शुभ ग्रहांमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. विवाहेच्छूंचे विवाह ठरतील. नवे मित्र मिळतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती साधणे शक्य होईल. काहींना वाहनसुख मिळेल. पण कौटुंबिक सुख, गृहसौख्य आणि मातृसुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या नोकरीत असलेल्या

युवकांना नोकरी सोडून काही नवीन करावेसे वाटेल. पण त्यांनी सध्या तसा विचारही करू नये. शास्त्रीय संशोधन



कार्यात कार्यरत असणारांना हाती घेतलेल्या संशोधन कार्यात प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. काहींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग संभवतात. जलभय व विषभय आहे. जपा.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. कामाचा ताण, वरिष्ठांचा त्रास, मानहानी, पदभ्रष्टता अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. घरी वडील मंडळींचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच विविध कारणांनी भावंडसुखात बाधा येणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना मनोनुकुल अनुभव येतील. शिक्षणक्षेत्र, अन्य बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना, शास्त्रीय संशोधन कार्यात रत असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या पूर्वार्धात शक्यतो प्रवास करू नका. असह्य मनस्ताप होण्याची शक्यता आहे. दांपत्यजीवनात दोघांपैकी कोणाचे अनारोग्य, दोघांत होणारे वाद, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक सुखात बाधा येईल. जपा. तसेच अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यताही दिसत नाही. या राशीच्या काही मंडळींची बुद्धी विकृत होणे संभवते. त्यामुळे "वरून कीर्तन, आतून तमाशा " अशा प्रकारचे ढोंगी आचरण होईल व त्यामुळे स्वत:चेच हसे करून घ्याल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघातभय आहे. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा, वाहने विचाराच्या तंद्रीत चालवू नका. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना शनि ग्रहाची साडेसाती आहेच व त्यात भर म्हणून या महिन्याच्या काळात इतर ग्रहांची साथही मिळू शकणार नाही. केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे अध्यात्म व कलात्मक क्षेत्रातील मंडळीना काही प्रमाणात काळ अनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात उष्णताविकारांचा त्रास व कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. त्यामुळे काही मंडळीना गहरे नैराश्य येणे शक्य आहे. शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतील. हाती घेतलेल्या कार्यात अडथळे निर्माण होतील. सर्व प्रकारच्या अपघातांपासून जपावे. नोकरीत वरिष्ठांशी मतभेद होतील व त्यांचा विरोध सहन करावा लागेल. मानहानी होऊन मानसिक ताण सहन करावा लागेल. जीवनसाथी व मुलांपैकी कोणाच्या अनारोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. काही मंडळीना जीवनसाथीच्या लहरी, विक्षिप्त आचरणामुळे व अन्य बाबीत मतभेदामुळे वैवाहिक जीवनातील अपेक्षित सुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या काही मंडळीना उगीचच काही आजार झाल्याची भावना होईल व काल्पनिक चिंतांचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शक्यतो प्रवास टाळा. कारण प्रवासात असह्य त्रास होणे संभवते. कसल्याही मोहाला बळी पडू नका. फ़सवणूक होण्याची शक्यता आहे. जपा. आध्यात्मिक उपासनेत मग्न असणारांपैकी काहीना गुरुकृपा तर काहीना थोरकृपा प्राप्त होईल. साहित्य, कला क्षेत्रातील काही मंडळीना कीर्ती, प्रसिद्धी मिळण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर मनोबल प्राप्त होण्यासाठी श्रीहनुमान उपासना करा व हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमित पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ सर्व प्रकारच्या आरोग्याचे दृष्टीने प्रतिकुल

असल्याचाच अनुभव येणार आहे. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. नियोजित कार्यात अडथळे निर्माण होतील. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. काही मंडळींच्या कुटुंबातील प्रिय जनांचे



स्थलांतर झाल्यामुळे मन उदास होईल. काही मंडळीना जीवनसाथीच्या अनारोग्याची चिंता अस्वस्थ करील; तर काही मंडळींच्या वैवाहिक जीवनात मतभेद, भांडणे होऊन डोके दुखू लागेल. काही मंडळीना पोटविकारांचा तर काहींना मूत्राशयविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारांत संशयाची परिस्थिती निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळीना वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. तसेच शारीरिक उष्णता भडकून मूळव्याधीसारख्या उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. अपार शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतील. सतत सावधान अवस्थेतच आचरण करा. कारण अपघातभय आहे. हाडमोड होणे संभवते. जपा. तसेच वीज, पाणी यांपासूनही धोका संभवतो. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या हर्षलमुळे काही मंडळींना अति विचारामुळे डोकेदुखीचा वा मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. पण हाच हर्षल गूढ व शास्त्रीय संशोधन कार्यात मग्न असणारांना प्रगतिकारक व लाभदायक होईल. अध्यात्मात रस असणारांना आध्यात्मिक उपासनेत प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. अशा प्रतिकुल परिस्थितीतही ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांना असा धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. तसेच शुक्रामुळेही काही लाभदायक घटना घडणे शक्य दिसते. श्रद्धेने हनुमानचालिसा स्तोत्राचे व बावन्नश्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना नोकरीत, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना औद्योगिक प्रगतीत, वैद्यकीय शास्त्रीय संशोधन कार्यात मग्न असणारांना संशोधन कार्य प्रगतीत, व्यापारी मंडळीना व्यापारात अपेक्षित प्रगतीच्या दृष्टीने व लाभाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्धच अनिकुल होणार आहे. तसेच उच्च बौद्धिक संशोधन कार्य व गूढ संशोधन कार्यात मग्न असणारांनाही यश लाभून देणारा हा काळ आहे. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग लाभेल. नवे प्रेमसंबंध व स्नेहसंबंध जुळून येतील. पण कुसंगतीची बाधा होणेही संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात दांपत्यजीवनात मतभेद, वाद, चिंता, दोघांपैकी कोणाचे अनारोग्य अशापैकी घटनांनी सुखसमाधान मिळण्याची शक्यता दिसत नाही. जपा. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांमध्येही वाद, भांडणे होऊन भागीदारीत बाधा निर्माण होणे संभवते. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. नेपच्यूनमुळे कुटुंबात गैरसमज होऊन गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. राहूमुळे या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल, अर्थलाभ होईल व शत्रूपासून रक्षण होईल. पण शनि ग्रहाची साडेसाती आणि त्यात बारावा शनि असल्यामुळे या राशीच्या मंडळीनी सतत सावधानतेनेच आचरण करावे; आर्थिक व्यवहार साधकबाधक विचार करूनच करावेत. नपेक्षा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. दिनांक २४-२५ या दोन दिवशी विशेष जपावे.

श्रद्धा असेल तर श्रीहनुमानचालीसा स्तोत्राचे दररोज नियमितपणे पठण करा व श्रीगणेशाची उपासना

केल्यास ती अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना संततिसुखाचे दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या, कोणाचे अभ्यासाकडे



दुर्लक्ष, काही कारणाने शिक्षणात येणारे अडथळे अशापैकी घटनांनी त्रस्त व्हाल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे वास्तुसुखात अडथळे निर्माण होतील. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. नेपच्यूनमुळे मन भावनाशील बनेल. त्यामुळे अध्यात्मात रुचि असेल तर उपासनेद्वारे प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. गुरु ग्रहामुळे आरोग्य उत्तम राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काही मंडळीना मंगळामुळे उष्णताविकार व रक्तविकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. याच मंगळामुळे चोरी वा फ़सवणूक होऊन अर्थहानी होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना लाभदायक होईल. विरोधकांवर मात कराल व शत्रू पराभूत होतील.काही मंडळीना बढती मिळेल. परंतु वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळाच. तरच सात्विक सुखसमाधान लाभेल. चिकित्सक बौद्धिक, शैक्षणिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र तसेच वकिली, सल्लागारी, अकौण्टन्सी कार्यक्षेत्र असणारांना प्रगती, अर्थलाभ व प्रसिद्धी मिळण्याची शक्यता आहे. परंतु कलाक्षेत्रातील मंडळीना मात्र काळ फ़ारसा अनुकुल होणार नाही. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज बावन्नश्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असाच असल्याचा अनुभव येईल. गैरसमजामुळे कुटुंबात भांडणे, वाद होणे संभवते. तसेच काही असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता दिसते. काही मंडळीना राहत्या जागेचा तर काहींना स्थावर संपत्तीबाबत त्रास सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे अनारोग्य होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात - विशेष करून शेवटच्या सप्ताहात संततीविषयक समस्या त्रस्त करतील. मुलांपैकी कोणाचा आजार, कोणाचे विक्षिप्त आचरण, कोणाचे मनाविरुद्ध वागणे अशापैकी घटनांनी त्रस्त व्हाल. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे मन अस्वस्थ राहील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या हर्षलमुळे उच्च बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळीना परदेशवारीची संधी प्राप्त होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक चिंता, आर्थिक संकटे निर्माण होतील जपा. या राशीच्या काही मंडळीना अनपेक्षित येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या कशा पार पडतील याची चिंता लागेल. अशा परिस्थितीत गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून अनुकुल, आनंददायक व लाभदायक घटना घडतील व हा विपरीत काळ सुसह्य होईल. दिनांक २२ ते २५ या तीन दिवसांच्या काळात अविस्मरणीय फ़लदायी घटना घडण्याची शक्यता दिसते. व्यापार-व्यवसायात अडथळे, अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना अधिकार-पद किंवा सत्ता स्थान मिळण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा व जन्मनक्षत्र श्रवण असणारांनी विष्णुसहस्रनाम नियमितपणे वाचावे.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन व विचार अत्यंत अस्थिर असले पाहिजेत. तसे खरोखरच असेल तर न कळत विचित्र, विक्षिप्त प्रकारचे आचरण होत असले पाहिजे. त्यामुळे अविचाराने खर्च होणे, फ़टकळपणे बोलून इतरांचा अपमान करणे अशा प्रकारचे आचरण होत असेल



तर असह्य मनस्ताप सहन करावा लागत असेल. पण गुरुच्या राशीतील हर्षल वाचा स्थानी असल्यामुळे विक्षिप्त आचरणाचे प्रमाण खूपच कमी प्रमाणात असावे, असे वाटते. या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच सर्व दृष्टींनी अनुकुल व लाभदायक होणार आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, पगारवाढ, उच्च पद, मानाचे स्थान, महत्त्वाच्या कामाची जबाबदारी पार पाडण्याची संधी असे काही मिळण्याची शक्यता आहे. त्याला मंगळाची उत्तम साथ मिळून आत्मविश्वासाने, हिमतीने कर्तृत्व सिद्ध करू शकाल. पण त्यासाठी मन:शक्ती वाढविणे अगत्याचे होईल. कारण सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत कोमल झाले असावे, असे वाटते. तसे असेल तर त्यामुळे मनविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण नातेवाईक मंडळींकडून त्रास होणे संभवते. शुक्राच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या ज्या मंडळींचा शेती व्यवसाय आहे त्यांना काल लाभदायक व सुखसमाधान देणारा असाच सिद्ध होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि-मंगळाचा भाग्यस्थानी असलेल्या राहू-शनीशी षडाष्टक योग होत असल्याने विविध कारणांनी या सुखसमाधानात थोडी कमतरता येणे संभवते. काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील. व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. आत्मशक्तीसाठी हनुमान उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी, कोणाचा किंवा कसलाही धाक सहन न होणारा असा झाला असण्याची शक्यता वाटते. मानसिक व्यग्रता असल्यामुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तरी लगेच नैराश्य येत असावे, असेही वाटते. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. विशेष करून आर्थिक बाबतीत चिंता उत्पन्न होणे संभवते. आर्थिक नुकसान होणे, अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या येऊन पडणे, आर्थिक फ़सवणूक होणे, अशापैकी आर्थिक चिंता निर्माण होणे संभवते. चिंतेमुळे व आप्तेष्ट भांडणामुळे शारीरिक उष्णता भडकून नेत्रविकार बळावतील. तसेच घसा, मान दाढा दुखणे अशापैकी आजार होणे संभवते. सतत अपेक्षाभंग होत असल्याचा अनुभव येईल. असमाधानकारक घटना घडतील. त्यामुळे काहींना मोठ्या आजाराला तोंड द्यावे लागण्याची शक्यता जाणवते. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना साहित्यनिर्मिती करणाऱ्या लेखकांना, वैद्यकीय व्यवसाय असणारांना, औषधविक्रेत्यांना, सर्व प्रकारच्या कलाकारांना, गुप्त पोलिसखात्यातील नोकरांना महिन्याचा उत्तरार्ध अतिशय अनुकुल, प्रगतिकारक व विविध प्रकारे लाभदायक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळीना भूमिलाभ तर काहींना धनलाभ होणे संभवते. पण भावंडाकडून त्रास होणेही संभवते. तसेच छुप्या शत्रूंचा त्रास होणेही संभवते, जपा., श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीदत्तात्रेय उपासना अनुकुल होईल. नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा,

**=====000=====**